# संविधान (एकशे दोनावी सुधारणा) अधिनियम,2018

[11 ऑगस्ट,2018.]

भारताचे संविधान यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :-

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

1. (1) या अधिनियमास, संविधान (एकशे दोनावी सुधारणा) अधिनियम, 2018, असे म्हणावे.

(2) तो, केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**अनुच्छेद 338 ची सुधारणा.**

2. संविधानाच्या अनुच्छेद 338 च्या खंड (10) मधील, "अनुच्छेद 340 च्या खंड (1) अन्वये नियुक्त केलेल्या आयोगाचा अहवाल मिळाल्यावर, राष्ट्रपतीने आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या अशा अन्य मागासवर्गांचे निर्देश आणि" हा मजकूर गाळण्यात येईल.

**नवीन अनुच्छेद 318 ख समाविष्ट करणे**

3. संविधानाच्या अनुच्छेद 338 क नंतर पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल :-

**राष्ट्रीय मागासवर्ग आयोग.**

"338ख. (1) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांकरता राष्ट्रीय मागासवर्ग आयोग म्हणून ओळखला जाणारा एक आयोग असेल.

(2) संसदेने या बाबतीत केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून, हा आयोग, अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर तीन सदस्य यांचा मिळून बनलेला असेल आणि अशाप्रकारे नियुक्त केलेला

अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांच्या सेवेच्या शर्ती व पदावधी, राष्ट्रपती, नियमाद्वारे निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

(3) आयोगाचा, अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती, राष्ट्रपती आपल्या सहीशिक्क्यानिशी अधिपत्राद्वारे करील.

(4) आयोगाला आपल्या कार्यपध्दतीचे विनियमन करण्याचा अधिकार असेल.

(5) आयोगाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :-

(क) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांसाठी या संविधानान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये किंवा शासनाच्या कोणत्याही आदेशान्वये तरतूद केलेल्या संरक्षक उपाययोजनांशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींचे अन्वेषण व संनियंत्रण करणे आणि अशा संरक्षक उपाययोजनांच्या कार्यान्वयनाचे मूल्यमापन करणे ;

(ख) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांच्या हक्कांच्या आणि संरक्षक उपाययोजनांच्या वंचिततेच्या बाबतीतील विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे ;

(ग) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांच्या सामाजिक-आर्थिक विकासामध्ये सहभागी होणे व त्याबाबत सल्ला देणे आणि संघराज्याच्या आणि कोणत्याही राज्याच्या नियंत्रणाखालील त्यांच्या विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे ;

(घ) त्या संरक्षक उपाययोजनांच्या कार्यान्वयनावरील अहवाल, दरवर्षी आणि आयोगाला योग्य वाटेल अशा इतर वेळी, राष्ट्रपतीला सादर करणे ;

(ङ) संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने, त्या संरक्षक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरता योजावयाचे उपाय आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांचे संरक्षण,

कल्याण व सामाजिक-आर्थिक विकास यांकरिता करावयाचे इतर उपाय, यांबाबत अशा अहवालामध्ये शिफारशी करणे ; आणि

(च) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांचे संरक्षण, कल्याण व विकास आणि उन्नती यासंबंधात संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून, राष्ट्रपती, नियमाद्वारे विनिर्दिष्ट करील, अशी इतर कार्ये पार पाडणे.

(6) राष्ट्रपती, संघराज्याशी संबंधित असणाऱ्या शिफारशींवर केलेली किंवा करण्याचे प्रस्तावित केलेली कारवाई आणि अशा शिफारशींपैकी कोणत्याही शिफारशी न-स्वीकारण्याची, कोणतीही असल्यास, कारणे, यांचे स्पष्टीकरण करणाऱ्या ज्ञापनासह असे सर्व अहवाल, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

(7) जेव्हा असा कोणताही अहवाल किंवा त्याचा कोणताही भाग, जी कोणत्याही राज्य शासनाशी संबंधित आहे अशा कोणत्याही बाबीशी संबंधित असेल तेव्हा, अशा अहवालाची एक प्रत, राज्य शासनाला पाठविण्यात येईल, ते, राज्याशी संबंधित असणाऱ्या शिफारशींवर केलेली किंवा करण्याचे प्रस्तावित केलेली कारवाई आणि अशा शिफारशींपैकी कोणत्याही शिफारशी न स्वीकारण्याची, कोणतीही असल्यास, कारणे, यांचे स्पष्टीकरण करणाऱ्या ज्ञापनासह ती प्रत, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

(8) खंड (5) च्या उपखंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींचे अन्वेषण करताना किंवा उपखंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही तक्रारीची चौकशी करताना, आणि विशेषत: पुढील बाबींच्या बाबतीत, आयोगाला, एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार असतील, त्या बाबी अशा :-

(क) भारताच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवून बोलावणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास भाग पाडणे ;

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सार्वजनिक अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदार व दस्तऐवज यांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ;

(च) राष्ट्रपती, नियमाद्वारे निर्धारित करील अशी कोणतीही बाब.

(9) संघराज्य व प्रत्येक राज्य शासन, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांवर परिणाम करणाऱ्या सर्व प्रमुख धोरणविषयक बाबींवर आयोगाशी विचारविनिमय करील.".

नवीन अनुच्छेद 342 क समाविष्ट करणे.

4. संविधानाच्या अनुच्छेद 342 नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल.:-

सामाजिक व शैक्षणिक-दृष्टया मागासवर्ग.

"342क. (1) राष्ट्रपतीला, कोणत्याही राज्याच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत, आणि जेव्हा ते एखादे राज्य असते तेव्हा, त्याच्या राज्यपालाशी विचारविनिमय केल्यानंतर, जाहीर अधिसूचनेद्वारे, त्या राज्याच्या किंवा, यथास्थिति, संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात, या संविधानाच्या प्रयोजनार्थ, जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग असल्याचे मानण्यात येतील असे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग विर्निदिष्ट करता येतील.

(2) संसदेला, कायद्याद्वारे, कोणत्याही सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गास, खंड (1) अन्वये काढलेल्या अधिसूचनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांच्या केंद्रीय सूचीत समाविष्ट करता येईल किंवा तीमधून वगळता येईल, परंतु उक्त खंडान्वये काढलेल्या अधिसूचनेत, पूर्वोक्तानुसार असेल त्याखेरीज, नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे, बदल केला जाणार नाही.".

अनुच्छेद 366 ची सुधारणा.

5. संविधानाच्या अनुच्छेद 366 मध्ये, खंड (26 ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल. :-

"(26 ग) "सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग" याचा अर्थ, असे मागासवर्ग की, जे या सविधानाच्या प्रयोजनार्थ, अनुच्छेद 342 क अन्वये, असे मागासवर्ग मानण्यात आले आहे;".

---

डॉ. जी. नारायण राजू,
सचिव, भारत सरकार.